NAVJYOT / VOL. XII / Issue- II ISSN 2277-8063

# ब्राम्हणेत्तर चळवळ आणि शाहू महाराज

**डॉ. सचिन श्रीरंग चव्हाण** नाईट कॉलेज ऑफ आर्टस् कॉमर्स, इचलकरंजी Email – sachinchavan3421@gmail.com

---

**प्रस्तावना-**

एकोणिसावे शतक हे प्रबोधनाचे शतक मानले जाते. सामजिक, आर्थिक व राजकीय अशा सर्वच स्तरात बदलाचे वारे वाहू लागले होते. वर्षानुवर्षे अनिष्ट प्रथा, परंपरा यामध्ये अडकलेल्या समाजाला नव्या विचारांवर आधारित समाजामध्ये परावर्तीत करण्याचा प्रयत्न सर्वच स्तरावर केला जात होता.याच पुरोगामी महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये ब्राम्हणेत्तर चळवळीचे योगदान महत्वपूर्ण आहे.या चळवळीच्या माध्यमातून सामाजिक, आर्थिक राजकीयक्षेत्रात परिवर्तन होण्यास मदत झाली. यामधूनब्राम्हणेत्तरनेतृत्व विकसित होण्यास मदत झाली व सामाजिक अभिसरण होण्यास मदत झाली. जाती, धर्माच्या पलीकडे मानवतेची शिकवणूक समाजामध्ये रुजली म्हणूनच आधुनिक महाराष्ट्राच्या निर्मितीमध्येब्राम्हणेत्तरचळवळीचे योगदान महत्त्वपूर्ण आहे.

शाहू महाराज आणि ब्राम्हणेत्तर चळवळ हा घटक अभ्यासात असताना प्रस्तुत चळवळ उभी राहण्यासाठी व ती वाढण्यासाठी शाहू महाराज यांचे योगदान मोठ्या प्रमाणात आहे. त्यांनी आपल्या संस्थानात देखील यासाठीचेप्रयत्न केले आहेत.

- राजर्षीशाहू महाराज आणि ब्राम्हणेत्तर चळवळ

महात्माज्योतिबा फुले यांच्यानंतरब्राम्हणेत्तरचळवळीचा वारसा चालविण्याचा मान छत्रपती शाहू महाराज यांना द्यावा लागतो. शाहू महाराज यांच्यावर महात्मा ज्योतीबा फुले यांच्या विचारांचा मोठा प्रभाव होता. तसाच तत्कालीन सामाजिक, आर्थिक परिस्थितीचा देखील प्रभाव होता.

- ब्राम्हणेत्तरचळवळीचा उदय आणि शाहू महाराजांचे योगदान

ब्राम्हणेत्तर चळवळ स्थापन होण्याआधी महाराष्ट्रात १९१६ साली आण्णासाहेब लठ्ठे, मुकुंदराव पाटील, वालचंद कोठारी, सी.के. बोले इत्यादींनी 'डेक्कन रयत असोशिएशन' या संघटनेची स्थापना केली. ' ब्रिटीश सिंहासना बद्दल निष्टा कायम ठेऊन, मागासलेल्या वर्गाच्या हक्काचे वहितसंबंधाचेसंरक्षण करण्याकरिता आणि त्या योगाने देशहित साधण्याकरिता प्रयत्न करणे हे' या संघटनेचे जाहीर धोरण होते. प्रस्तुत संघटनेमार्फत " डेक्कनरयत" नावाचे वृत्तपत्र सुरु करण्यात आले. यानंतर काही कालावधीतच भास्करराव जाधव, श्रीपतराव शिंदे यांनी 'ऑल इंडिया मराठा लीग' ही आणखी एक राजकीय संघटना निर्माण केली. दरम्यानच्या काळात मोन्तेग्युयांनी राजकीय सुधारणांची घोषणा केली. यानुसार हिंदुस्थानच्या भावी कायदेमंडळातब्राम्हण प्रतिनिधींचे प्राबल्य न राहता ब्राम्हणेत्तरसमाजाला त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात स्थान मिळावे यासाठी लोकजागृतीची मोहीम सुरु झाली होती यातूनच मराठे, जैन, लिंगायत आदी ब्राम्हणेत्तर जातींना स्वतंत्र प्रतिनिधित्व मिळावेही ब्राम्हणेत्तर समाजाची मागणी पुढे आली.

इंग्रजांचे राज्य घालवण्याकरिता 'फोडा आणि झोडा' या कुटील राजनीतीचा वापर स्वराज्याच्या मागणीकरिता चालू होता. महाराष्ट्रातही ब्राम्हणेत्तर समाजाने आपल्या हिताच्या संरक्षणासाठी स्वतंत्र मतदारसंघाची मागणी केली होती.ब्राम्हणेत्तर समाज हा राष्ट्रीय प्रवाहाच्या बाहेर राहू नये हा त्यामागचा हेतू होता. परंतु ब्राम्हण वर्गाने या जातवार प्रतिनिधींच्या मागणीची कुचेष्टा करण्यास सुरवात केली. 'कायदेमंडळात वाण्यांनी जाऊन काय तागडी तोलायची आहे,की कुंभारांनी जाऊन मडकी घडवायची आहेत' अशा पद्धतीने ब्राम्हण –ब्राम्हणेत्तरवादास अधिक धारचढली गेली.

उपरोक्त राजकारणातील हेवेदाव्यामुळेब्राम्हणेत्तर वर्गाच्या हिताची काळजी शाहू महाराजांना वाटत होती. उघडपणे शाहू महाराजांना इंग्रजांच्या साम्राज्यसत्तेच्या राजकारणात भाग घेण्यास बंधने येत होती. तरीही शाहू महाराजांनी ब्राम्हणेत्तरांच्या सभा परिषदा यामध्ये प्रत्यक्ष भाग घेऊन ४ ते ५ वर्ष ब्राम्हणेत्तर चळवळीची सूत्रे आपल्या हाती ठेवली व आपले मार्गदर्शन व सहाय्य चालूच ठेवले.

मोन्तेग्यू हे हिंदुस्थानच्या सुधारणाविषयक घोषणाची प्रतिक्रिया आजमावण्यासाठी व चर्चा करण्यासाठी हिंदुस्थानात आले होते तेंव्हा १९१७ मध्ये त्यांनी शाहू महाराज यांची भेट घेतली. या भेटीत अस्पृश्य वर्गासह सर्वब्राम्हणेत्तरसमाजास स्वतंत्र मतदार संघ दिले गेले पाहिजेत ही मागणी करीत असताना शाहू महाराज असे म्हणतात की, "हिंदुस्थानात सक्तीचे प्राथमिक शिक्षण अग्रक्रमाने देणे आवश्यक आहे. जर स्वराज्य यशस्वी व्हायचे असेल तर जातीभेद नष्ट झाले पाहिजेत एवढेच नव्हे तर आंतरजातीय विवाह झाले पाहिजेत नाहीपेक्षा स्वराज्य ही मुठभरलोकांची मिराज होईल अशी भीती वाटते".

- वृत्तपत्रांना सक्रीय उत्तेजन–

ब्राम्हणेत्तर चळवळीतील शाहू महाराजांचे एक वैशिष्ट्यपूर्ण योगदान म्हणजे ब्राम्हणेत्तरवृत्तपत्रांना दिलेले सक्रीय उत्तेजन होय. बहुतेक सर्व ब्राम्हणी वृत्तपत्रे ब्राम्हणाच्या हिताची जपणूक करणारी होती. अशा परिस्थितीमध्येब्राम्हणेत्तरांची बाजू समर्थपणे मांडणाऱ्या वृत्तपत्रांची गरज होती. १९१७ मध्ये मुकुंदराव पाटील यांचे 'दिनमित्र' हे पत्र सुरु झाले यानंतर पुणे, बडोदा येथे एकामागून एक अशी पत्रके निघायला सुरवात झाली. वालचंद कोठारी यांचे 'जागरूक' भगवंतराव पाळेकरांनी 'जागृती' अशी दोन वृत्तपत्र सुरु

केली. त्यांनतर पुढील चार पाच वर्षात महाराजांच्या पुढाकाराने आणि उत्तेजनाने एकामागून एक वृत्तपत्रे सुरु केली. ही वृत्तपत्रे सुरु करण्याच्या मागे महाराजांनी आपले नैतिक आणि आर्थिक पाठबळउभे केले होते.

- राखीव जागा–

मोन्त्येगु यांनी हिंदुस्थानच्या भेटीनंतर आपला अहवाल पार्लमेंटला सादर केला आणि २३ डिसेंबर १९१९रोजी पार्लमेंटने 'गव्हन्मेंट ऑफ इंडिया अक्ट' पास केला. या कायद्यान्वे ब्राम्हणेत्तरांनाकायदेमंडळात राखीव जागांची तरतूद करावी लागली. 'मुंबई इलाख्यातील एकूण ८६ लोकनियुक्त जागांपैकी ३५ जागांपैकी ७ जागाब्राम्हणेत्तरांसाठी (मराठे व तत्सम जाती) राखून ठेवल्या गेल्या. अस्पृश्य वर्गास दोन जागा मिळाल्या त्यावरील प्रतिनिधीची नेमणूक गव्हर्नर करणार होता.

शाहू महाराजांनी मागणी केल्याप्रमाणे ब्राम्हणेत्तर जातींना कायदेमंडळात स्वतंत्र मतदारसंघ मिळाले नाहीत पण राखीव जागा मिळाल्या. प्रस्तुत राखीव मतदारसंघातून तसेच मिश्र मतदार संघातून ब्राम्हणेत्तर पक्षाने आपले उमेदवार उभे केले. १९२० च्या नोव्हेंबर महिन्यात कायदेमंडळाच्या निवडणुका झाल्या. सी. के. बोले, आनंदराव सुर्वे, कीर्तनराव निंबाळकर, गंगाजी काळभोर, पांडुरंग जाधव, दाजीराव विचारे इत्यादी ब्राम्हणेत्तर मंडळी मुंबई कायदेमंडळास गेली तरआण्णासाहेबलठ्ठेव केशवराव बागडे केंद्रीय कायदेमंडळावर निवडून आले.

- संस्थानच्या प्रशासनात ब्राम्हणांचा प्रभाव कमी केला-

संस्थानच्या प्रशासनात तत्कालीन कालखंडात ब्राम्हणांची मक्तेदारी होती. प्रस्तुत मक्तेदारी मोडीत काढण्यासाठी शाहू महाराजांनी 'राज – प्रतिनिधी मंडळ' बरखास्त करून त्याजागी सर्व समाज घटकांचा सहभाग असलेले'प्रशासन मंडळ' नेमले.बहुजन समाजातील साक्षरांना संस्थानच्या सेवेत प्राधान्य देण्याचे शाहू महाराजांनी ठरविले. बहुजन समाजालाज्ञान व सत्ता या दोन्हीचा योग्य वाटा दिल्याशिवाय त्यांना हे 'आपले राज्य' वाटणार नाही हे ओळखून बहुजन समाजात तसा विश्वास निर्माण केला. शाहू महाराजांनी 'हुजूर ऑफिस' नावाचे नवीन सचिवालय सुरु केले. हुजूर चिटणीस म्हणून हुशार व कर्तबगार व्यक्तीची नेमणूक केली जाई. यामुळे तत्कालीन ब्राम्हणी वर्चस्वाला यामुळे धक्का पोहचला होता.

- ब्राम्हणेत्तर वर्गातून भरती करण्यास सुरवात केली –

प्रशासनात विविध जातीचा सत्तासमतोल राखला जावा याकरिता शाहू महाराजांनी संस्थानांतील रिक्त झालेल्या जागेवरब्राम्हणेत्तर वर्गातील लोकांच्या नेमणुका केल्या. मराठा, कायस्थ, जैन, लिंगायत या जातीतील लोकांची नेमणूक करण्यास सुरवात केली. यामध्येमराठा समाजाचे भास्करराव जाधव यांची महसूल अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली. आरोग्य खात्यात रखमाबाई केळवकर यांची नेमणूक करण्यात आली. संस्थानच्या कार्यकारी अभियंता म्हणून अमृतराव विचारे यांची नेमणूक करण्यात आली व हुजूर चिटणीस पदावर रावबहादूर रघुनाथ व्यंकोजी सबनीस यांची नेमणूक करण्यात आली. त्यांच्या या कार्यप्रणालीमुळे ब्राम्हण नोकरशाहीला धक्का बसला. परिणामी प्रशासनातील ब्राम्हणांची मक्तेदारी कमी होऊन ब्राम्हणेत्तरांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत गेली.

- संस्थानच्या नोकऱ्यात मागासवर्गाला५० टक्के आरक्षण –

शाहू महाराजांनी सर्व जाती जमातीच्या लोकांचा उत्कर्ष साधण्यासाठी संस्थानच्या नोकऱ्यात मागासवर्गाला ५० टक्के आरक्षण देण्याचाक्रांतिकारक जाहीरनामा २६ जुलै १९०२ रोजी इंग्लंड मधून काढला.त्यामध्ये शाहू महराज असे म्हणतात की, हा हुकुम पोहचलेल्या तारखेपासून रिकामे झालेल्या जागांपैकी शेकडा पन्नास जागा मागासलेल्यालोकातील भराव्यात. यामध्ये मराठा, जैन, लिंगायत याही जातीचा समावेश होता.

**समारोप –**

राजर्षी शाहू महाराजांना एक संस्थानिक म्हणून अनेक मर्यादा असल्या तरी त्यांनी ब्राम्हणेत्तर चळवळ उभी करण्यासाठी मोठे योगदान दिले. त्यांनी आपल्या राजकीय, सामाजिक व शैक्षणिक कार्यातूनब्राम्हणेत्तर चळवळीला चालना दिली आणि एकूणच लोकशाहीचा पायाविस्तृत केला.समाज सुधारणा व बहुजन समाजाच्या राजकीय जाणीवा जागृत व वृधीगंत करण्यात राजर्षी शाहू महाराज यांचे योगदान मोठे आहे. कारण भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर'राजकीय सहभागाला महत्व प्राप्त होणार होते' तत्पूर्वीच शाहू महाराजांनी बहुजनसमाजात राजकीय समाजिकरणाची प्रक्रिया सुरु केली होती. हे त्यांच्या कार्यावरून दिसून येते.

**संदर्भ**

१. चव्हाण. रा. ना (संपा) रमेश चव्हाण – राजर्षी शाहू महाराज यांचीसामाजिक विचारधारा व कार्य, प्रतिभा प्रकाशन , कोथरूड
२. फडके. य. दी – विसाव्या शतकातील महाराष्ट्र (खंड १, २) श्रीविद्या प्रकाशन, पुणे
३. भोले भा. ल, बेडकिहाळ किशोर – शतकांतराच्या वळणावर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अकादमी सातारा
४. पवार जयसिंगराव (संपा) - राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहासप्रबोधनी कोल्हापूर